# AISSMS
## COLLEGE OF ENGINEERING

ज्ञानम् सकलजनहिताय

Accredited by NAAC with "A+" Grade

**डॉ डी एस बोरमणे**
प्राचार्य

संदर्भ क्र.एआयएसएसएमएससीओई/प्राचार्य/3LL/२०२३-२४
दिनांक : ०५/०६/२०२४

## कार्यालयीन आदेश :

**विषय : महाविद्याल विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष (College Student Grievance Redressal Cell) स्थापन करण्याबाबत.**

संदर्भ :१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांचे दिनांक २५/०२/२०१९ रोजीची अधिसूचना
२) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांचे पत्र क्र. विविमं/२०२३-२४/३६४, दि. ३०/०५/२०२४

वरील संदर्भीय पत्र व विषयास अनुसरून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ६) यांच्या कलम ५६ च्या पोट- कलम (२) चा खंड (ख) आणि कलम ७१ चे पोट-कलम (११) तसेच कलम ७२ चे पोट-कलम (१०) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून. महाराष्ट्र शासन विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाच्या कामकाजाच्या कार्यकारी यंत्रणेशी संबंधित एकरूप परिनियम विहित करण्यात आले आहेत. सन २०१९ च्या एकरूप परिनियम क्रमांक ५ (३) नुसार महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या तक्रारी दूर करण्यासाठी आणि अशा तक्रारी कमी करण्यासाठी तसेच त्यास अटकाव करण्यासाठी निरनिराळे मार्ग व साधने उच्चतर प्राधिकरणांना सुचविण्यासाठी विद्यापीठामध्ये आणि प्रत्येक महाविद्यालयामध्ये विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष (College Student Grievance Redressal Cell) स्थापन करणे आवश्यक आहे. विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाची कामकाज विषयक कार्यकारी यंत्रणा हि, विद्यापीठ अनुदान आयोग (तक्रार निवारण) विनियम, २०१२ किंवा त्या- त्या वेळी अमलात असलेले इतर कोणतेही विनियम यांच्या तरतुदीनुसार तयार केलेल्या परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे असेल. याबाबतीत सर्व तक्रारी या. सर्वप्रथम महाविद्यालय तक्रार निवारण कक्षाला उद्देशून करण्यात येतील. त्यास अनुसरून, ऑल इंडीया श्री शिवाजी मेमोरियल सोसायटीचे कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, पुणे - ४११ ००१ ह्या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ मध्ये दिनांक ०६/०६/२०२४ पासून पुढील दोन (०२) वर्षे अथवा पुढील आदेश मिळेपर्यंत खालील प्रमाणे महाविद्यालय विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष (College Student Grievance Redressal Cell) स्थापन करण्यात येत आहे.

| अ.क्र. | समितीचे सदस्य | पदनाम | सदस्यांचे नांवे |
|---|---|---|---|
| १ | महाविद्यालयाचे प्राचार्य | अध्यक्ष | डॉ दत्तात्रय शंकर बोरमणे, प्राचार्य |
| २ | महाविद्यालयातील प्राचार्यांनी नामनिर्देशित केलेले वरिष्ठ अध्यापक | सदस्य | डॉ (मिसेस) ऐश्वर्या आशिष आपटे, सहयोगी प्राध्यापक इन इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग |
| ३ | महाविद्यालयातील प्राचार्यांनी नामनिर्देशित केलेले वरिष्ठ अध्यापक | सदस्य | डॉ चंद्रशेखर सुरेश धारणकर, सहाय्यक प्राध्यापक इन मेकॅनिकल इंजिनीअरिंग |

AISSMS COLLEGE OF ENGINEERING PUNE-1

महाविद्यालयातील विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष, विद्यार्थ्यांच्या गाऱ्हाण्यांवर विचार करताना, नैसर्गिक न्यायाच्या तत्वांचे पालन करील. बैठीकीसाठीची गणपूर्ती हि, अध्यक्षासह दोन जण इतकी असेल. तक्रारदार व्यक्तीला आदेशाची एक प्रत पुरविली जाईल. आलेल्या तक्रारीची तात्काळ दखल घेऊन तात्काळ निवारण करण्यात येईल व त्याचा अहवाल कार्यालयास सादर करण्यात येईल.

**डॉ डी एस बोरमणे**
प्राचार्य

प्रत : १) महाविद्याल विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाचे सर्व सभासद यांच्या माहितीकरिता व पुढील कार्यवाही करिता.
२) सर्व विभागप्रमुख यांचे माहितीकरिता,
३) आस्थापना विभाग,
४) विद्यार्थी विभाग
५) डॉ अमोल भाऊसाहेब पाटील, विद्यार्थी विकास कक्ष समन्वयक.

प्रत : मा. ऑनररी सेक्रेटरी, ऑल इंडीया श्री शिवाजी मेमोरियल सोसायटी, ५५-५६, शिवाजी नगर, पुणे - ४११ ००५ यांच्या माहितीकरिता सविनय सादर.